# जिल्हा बाल संरक्षण कक्ष कंञाटी पदभरती २०१९

**महिला व बाल विकास विभागाअंतर्गत एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षातील पदांकरीता कंत्राटी पद्धतीने अर्ज करण्याबाबतच्या सूचना .**

१ . योजनेअंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाकरीता प्रत्येक जिल्हयात १२ पदे कंत्राटी तत्वावर मंजूर आहेत . सदर पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत .

२ . जिल्हानिहाय उपलब्ध पदांचा सविस्तर तपशील शैक्षणिक पात्रता अनुभव आणि इतर अटी व शर्तीबाबतची माहिती wcdcommpune.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे .

३ . सदरच्या पदासाठी अर्ज या संकेतस्थळावर दिलेल्या सूचनेनुसार ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे कोणत्याही परिस्थीतीत ऑफलाईन अथवा पोस्टाने पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत .

४ . अर्ज भरताना दिलेल्या सूचना व्यवस्थीत वाचून अर्ज भरावा . अर्धवट भरलेले चुकलेले अर्ज कोणत्याही परिस्थीतीत ग्राहय धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी .

५ . ऑनलाईन अर्जामधील चिन्हांकीत सर्व बाबी पुर्ण भरणे आवश्यक राहील . तसेच अर्जात स्वतःचा कार्यान्वीत फोन नंबर (भ्रमणध्वनी कमांक) आणि ई मेल नोंदविणे आवश्यक आहे .

६ . उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रकियेबाबतच्या सूचना या संकेतस्थळावर अथवा ई मेलव्दारे कळविण्यात येईल .

७ . सदरच्या भरती प्रकियेत अथवा पदांमध्ये फेरबदल तसेच भरती प्रकिया काही अपरीहार्य कारणास्तव स्थगीत अथवा रद्द करण्याचे अधिकार सदस्य सचिव तथा आयुक्त महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे .

८ . उमेदवाराने कोणत्याही एकाच जिल्हयातून अर्ज करावा मात्र जिल्हा बाल संरक्षण अधिकारी या पदाकरीता अर्ज करणारे उमेदवार कोणत्याही जिल्हयात अर्ज करू शकतील .

९ . एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करावयाचा असेल तर स्वतंत्र अर्ज न करता या अर्जातच प्राधान्यकम नमूद करावयाचा आहे .

१० . एका व्यक्तीचे एकापेक्षा जास्त अर्ज आढळून आल्यास तो अर्ज बाद ठरेल .

११ . एकदा निवड झाल्यानंतर कोणत्याही परिस्थीतीत जिल्हाबदल करून मिळणार नाही .

१२ . एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत कामाचा अनुभव असलेल्या/कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना भरतीप्रकियेत प्राधान्य देण्यात येईल परंतू अशा कर्मचा-यांना भरती प्रकियेत सहभागी होणे आवश्यक राहील .

१३ . अर्ज शुल्क रूपये १००/- एवढे असुन सदर शुल्क ऑनलाईन पदधतीने भरण्यात यावे .

१४ . अर्ज सादर करण्याची व शुल्क भरण्याची अंतिम मुदत २६ सप्टेंबर २०१९ रोजी रात्री ११ . ५९ वाजेपर्यंत राहील या नंतर संकेतस्थळ बंद होईल .

१५ . पदाकरीता आवश्यक असलेल्या अटी शर्तीतील एकाही अटीची पुर्तता होत नसेल तर अर्जदाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल .

जिल्हा बाल संरक्षण कक्षातील पदनियुक्तीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

१.सदर पदे संपुर्णतः कंत्राटी तत्वावर राहणार असून कराराची मुदत ११ महिने किंवा योजना कार्यान्वीत असेल यापैकी जे आधी घडेल या मुदतीकरता राहील.मुदत संपल्यावर कंत्राटी तत्वावर कार्यरत व्यक्तीचा सदर पदावर कोणताही हक्क राहणार नाही.

२.सदरची नियुक्ती ही करारपद्धतीने असल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे व नियमीत सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळणे अनुज्ञेय असणार नाही.

३.सदरची पदे ही ११ महिन्यांच्या करार तत्वारील व अस्थाई स्वरूपाची असल्याने संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही त्याबाबत १00/- रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र/हमीपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.अधिकारी/कर्मचारी शारिरीक,मानसीक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावीत सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

५.नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-याचा कराराचा कालावधी ११ महिने पुर्ण झाल्यानंतर आणि योजना कार्यान्वीत असल्यास सदरचा कालावधी संपल्यानंतर कर्मचा-यांच्या कामकाजाचे मुल्यमापन करून पुढील ११ महिन्यांकरीता करार कालावधीमध्ये वाढ करण्याचा अंतिम अधिकार संबंधीत जिल्हाधिकारी यांचा राहील.करार कालावधीमध्ये वाढ झाल्यास पुनश्च करारनामा करणे बंधनकारक राहील.नियुक्तीच्या कालावधीत पदनिहाय दिलेल्या कर्तव्य व जावाबदा-या पार पाडण्याची जबाबदारी ही संबंधीत व्यक्तीची राहील व त्याबाबत १00/- रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र/हमीपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

६.नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थीतीत कोणत्याही वेळी सदरच्या कंत्राटी सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

७.नियुक्त झालेला अधिकारी/कर्मचारी त्याच्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायीक वा इतर कामात गुंतलेला नसावा.

८.करार पदधतीवरील नियुक्त कर्मचा-यास कार्यालयात प्राप्त होणारी प्रकरणे,कागदपत्रे व आधारसामग्री याबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.अशा गोपनीयतेच भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात येईल.

९.उमेदवाराविरूद्ध भारतातील कोणत्याही पोलीस ठाण्यात गुन्हयाची नोंद नाही याबाबत स्वसाक्षांकीत हमीपत्र दयावे लागेल. याबाबत मागाहुन काही खुलासा झाल्यास किंवा तशी नोंद आढल्यास उमेदवाराची नियुक्ती तात्काळ रदद करण्यात येईल.

१0.सेवा सोडायची असेल तर १ महिना लेखी सुचना दयावी लागेल किंवा १ महिण्याचे मानधन दयावे लागेल.

११.जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे कामकाज हे अत्यावश्यक सेवेत येत असल्यामुळे नियुक्त कर्मचा-यास संपुर्ण जिल्हयात/राज्यात/देशात प्रवास करावा लागेल.

१२.कार्यालयीन कामकाजाची वेळ शासकीय वेळेनुसार असेल, कामाच्या व्याप्तीनुसार अधिक वेळेपर्यंत अथवा अत्यावश्यक परिस्थीतीत काम करण्याची तयारी ठेवावी लागेल.

१३.नियुक्त उमेदवाराच्या ताब्यात असलेल्या कार्यालयीन मालमत्तेची योग्य काळजी त्यास घ्यावी लागेल.सदर मालमत्तेचे नुकसान झाल्यास संबंधीत कर्मचा-याकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल.